क्र.मासं/रवका/न.क्र.२८३/
**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.**
एक्स्ट्रेला बॅटरीज विस्तारीत इमारत,
तळ मजला, प्लॉट नं.१,धारावी रोड,माटुंगा,
मुंबई - ४०० ०१९.
email : cgmp@mahadiscom.in
website : www.mahadiscom.in

**महावितरण**
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.
दुरध्वनी क्रमांक : ०२२ - २४०७७४४१
फॅक्स क्रमांक : ०२२ - २४०२५७६३

# प्रशासकीय परिपत्रक क्र. ४७९ दिनांक २४ / ०३ / २०१४

विषय : सा.आ.क्र.७४ (क) दि.३०.०४.१९७४ अनुसार 'पहारेकरी' आणि 'स्थापत्य मदतनीस' या पदांकरिता उच्च वेतनश्रेणीचा तृतीय लाभ विहित करण्याबाबत.

.....

सा.आ.क्र.७४ (क) दिनांक ३०.०४.१९७४ अन्वये कंपनीमध्ये कार्यरत अधिकारी/कर्मचाऱ्यांना त्यांच्या सेवा कालावधीत उच्च वेतन श्रेणीचे प्रथम व द्वितीय लाभ देण्याबाबतच्या तरतुदी करण्यात आल्या आहेत. तसेच प्रशासकीय परिपत्रक क्र.३०४ दि.२८.०७.२०१० अनुसार ज्या कर्मचाऱ्यांची तदर्थ म.रा.वि.मंडळ व मंडळाच्या विभाजनानंतर महावितरण कंपनीमध्ये अखंडित २८ वर्षे सेवा पूर्ण झाली आहे अशा कर्मचाऱ्यांना विहित करण्यात आलेल्या अटी व शर्तीच्या अधीन राहून उच्च वेतनश्रेणीचा तृतीय लाभ मंजूर करण्याबाबतच्या सूचना प्रसारित करण्यात आलेल्या आहेत.

२. या अनुषंगाने प्रशासकीय परिपत्रक क्र.३२० दि.२२.११.२०१० अन्वये 'पहारेकरी' आणि 'स्थापत्य मदतनीस' या पदांवर कार्यरत कर्मचाऱ्यांना उच्च वेतनश्रेणीचा तृतीय लाभ देण्याकरिता वेतनश्रेण्या विहित करण्यात आलेल्या आहेत. सदर विहित करण्यात आलेल्या वेतनश्रेण्यांबाबत सखोल परिक्षण करून कंपनीमध्ये लागू करण्यात आलेल्या सुधारित कर्मचारी मानंकानुसार तसेच कंपनीत विविध पदांकरिता लागू करण्यात आलेल्या संवर्गनिहाय वेतनश्रेण्या विचारात घेऊन व्यवस्थापकीय संचालक यांनी संचालक (वित्त), संचालक (संचलन), संचालक (प्रकल्प) यांच्याशी विचारविनिमय करुन 'पहारेकरी' आणि 'स्थापत्य मदतनीस' या पदांकरिता तृतीय लाभ देण्यासाठी विहित करण्यात आलेल्या वेतनश्रेण्या खालील प्रमाणे सुधारित करण्याकरिता मजुरी प्रदान केली आहे.

| पदनाम | सा.आ.क्र.७४ (क) चा तृतीय लाभ द्यावयाचे प्रस्तावित वेतनश्रेणी |
|---|---|
| **पहारेकरी / स्थापत्य मदतनीस**<br>रु.८०४०-१५५-८८१५-१८५-१०६६५-२२०-१५७२५ | रु. ९५७०-३२५-१११९५-३६०-१४७९५-३९०-२७२७५ |

३. सर्व संबंधितांना विनंती करण्यात येते की 'पहारेकरी' आणि 'स्थापत्य मदतनीस' या पदांवर कार्यरत कर्मचाऱ्यांना उच्च वेतनश्रेणीचा मंजूर करण्यात आलेला तृतीय लाभ हा उपरोक्त नमूद वेतनश्रेणीनुसार सुधारित करण्यात यावा व त्या अनुषंगाने वेतननिश्चिती करण्यात यावी.

४. सा.आ.क्र.७४ (क) दि.३०.०४.१९७४ व प्रशासकीय परिपत्रक क्र.३०४, दिनांक २८.०७.२०१० मधील इतर तरतूदी अबाधित राहतील.

५. सदर प्रशासकीय परिपत्रक कंपनीच्या (R-APDRP Portal) वर उपलब्ध करण्यात आले आहे.

२४/३/१४

( संदेश हाके )
**मुख्य महाव्यवस्थापक (मासं)**

D:\O&M\Adm.Cir.F.N.283.3rd G.O.74.doc